प्रकरण एक

# *विषय-प्रवेश*

# प्रकरण पहिले

## विषय - प्रवेश

१८९५ ते १९३५ या कालखंडातील नियतकालिकांतर्गत व ग्रंथगत समीक्षा हा प्रस्तुत प्रबंधाचा विषय आहे. नाट्यसमीक्षा हा साहित्यसमीक्षेचाच एक खास प्रकार असल्याने प्रत्यक्षतः नाट्यसमीक्षेकडे वळण्यापूर्वी समीक्षा म्हणजे काय, समीक्षा : शास्त्र की कला, समीक्षेच्या निरनिराळ्या पद्धती, समीक्षकाच्या ठिकाणी अपेक्षित असलेले गुणधर्म इत्यादी समीक्षाविषयक सामान्य विवरण केले आहे. तसेच इतर साहित्यसमीक्षेहून नाट्यसमीक्षेचे वेगळेपण नेमके कशात असते हे विशद केले आहे. या प्रास्ताविक विवेचनानंतर प्रस्तुत अभ्यासविषयीभूत कालखंडातील नाट्यसमीक्षेच्या सामान्य स्वरूपाचा परिचय करून देण्यात आला आहे.

### १.१.१ समीक्षा म्हणजे काय ?

नाट्यसमीक्षा हा साहित्य समीक्षेचाच एक खास प्रकार असल्याने तिच्याबद्दलच्या विचारापूर्वी प्रथम समीक्षा म्हणजे काय हे विचारात घेणे इष्ट ठरेल. वाङ्मयाबद्दल विवरण, विवेचन किंवा परीक्षण या प्रकारे जे

लिहिले आहे, त्याचा समानार्थ "समीक्षा" या शब्दात केला जातो. "जीवनावरील भाष्य" असे सर्जनशील साहित्याचे वर्णन केले तर समीक्षेचे वर्णन "भाष्यावरील भाष्य" असे करावे लागेल. कलाकृतीवर प्रकाश टाकणे हेच समीक्षेचे खरे कार्य असते. एखाद्या साहित्यकृतीतून प्रतीत होणारा जीवनाचा अर्थ समीक्षा वाचकांना उकलून दाखविते. सूक्ष्म दृष्टी, अवगाहनसामर्थ्य व समीक्षकाच्या ठिकाणचे विषयाचे सूक्ष्म ज्ञान यामुळे समीक्षकाने केलेली समीक्षा वाङ्मयातील सौंदर्य व सामर्थ्य यावरोबरच, सूचकता व मर्म यांचे रहस्य दर्शविते. कोणत्याही साहित्यकृतीकडे रसज्ञतेने व अभिरुची-संपन्नतेने पाहणे व तिचे योग्य मूल्यमापन करणे म्हणजे समीक्षा होय. निरनिराळ्या शब्दकोशांची साक्ष पाहिली तरी जवळ जवळ सर्वांनी समीक्षेची व्याख्या देताना वाङ्मयीन कृतीचे परिशीलन व मूल्यमापन करणे या गोष्टीवरच भर दिला आहे, असे दिसते. पुढील व्याख्या लक्षात घेतल्या तर हे स्पष्ट होईल.

1) Criticism is the art of estimating the qualities or character of literary or artistic work - 1

2) Criticism is the art of evaluating or analyzing with knowledge and propriety, the beauties and faults of works of art or literature - 2

3) Criticism is the conscious evaluation or appreciation of work of art either according to critic's personal taste or according to some accepted aesthetic ideas. - 3

4) Criticism is the art of judging the qualities and values of an aesthetic object, whether in literature or fine art. - 4

एखादी साहित्यकृती चांगली आहे की वाईट् एवढेच सांगून समीक्षा थांबत नाही, तर लेखकाला त्या कृतीतून काय व्यक्त करावयाचे होते, जे व्यक्त करावयाचे होते, तेच तिच्यातून व्यक्त झाले का, आणि जे व्यक्त झाले ते बरोबरच आविष्कारयोग्य आहे का इत्यादि प्रश्नांची उत्तरे देण्याचाही ती प्रयत्न करते. वाङ्मयीन कलाकृतीची समीक्षा म्हणजे सर्वसाधारण रसिकांपैकीच पण जास्त चोखंदळ असलेल्या रसिकाने केलेले रसग्रहण होय. साहित्यसमीक्षेचा विषय वाङ्मयीन कलाकृती हाच असतो. "वाङ्मयीन कलाकृतींमध्ये शब्दांना, भावनांना, कल्पनांना नित्याच्या अर्थापेक्षा वेगळे कलात्मक घटकांचे नवरूप लाभते. या नवरूपाचा शोध आणि नवनिर्मितीमधील विकल्पनांच्या व्यापाराचे आकलन हाच समीक्षाशास्त्राचा विषय होय."[१] असे दि.के.बेडेकर म्हणतात.

समीक्षा केवळ गुणदोषविवेचनात विराम पावत नाही, तर दोष असतील त्या ठिकाणी गुणवत्तेसाठी काय हवे होते व ते कसे साधता येईल तेही सांगण्याकडे तिचा कल असतो. त्यामुळे कळत वा नकळत लेखकाकडून अशा समीक्षेला अनुसरून आपल्यात सुधारणा घडवून आणण्याची शक्यताही निर्माण होते.

अर्थात् हे शक्य असले तरी समीक्षा ही लेखकासाठी असण्यापेक्षा प्रामुख्याने वाचकासाठी असते. कलाकृतीकडे बघण्याचा वाचकाचा दृष्टिकोन ती अधिक सुजाण बनविते. साहित्यकृतीतील सौंदर्य समीक्षकाने उलगडल्यामुळे सामान्य वाचकाला तिचा आस्वाद घेणे सोपे जाते.

मात्र वाङ्मयसमीक्षा म्हणजे ग्रंथाचे निरीक्षण करून व वर्गीकरणाद्वारे एखादा निष्कर्ष सादर करून सिद्धांत प्रस्थापित करणारा शास्त्रप्रकार नव्हे. साहित्यशास्त्रात आधीच प्रस्थापित झालेली तत्त्वे, मूल्ये किंवा निकष वाङ्मयसमीक्षक विशिष्ट कृतीला लावून दाखवतो. असे करताना त्याचे काम केवळ ग्रंथविषयाचा परिचय करून देऊन काही गृहित वाङ्मयनिकष लावून गुणदोषविवेचन करणे, एवढेच नसते, तर सुदृढ वाङ्मयनिर्माता जसा आपली जीवनविषयक मूल्ये आपल्या कृतीद्वारे व्यक्त करतो, त्याचप्रमाणे वाङ्मय-

समीक्षकही काही प्रमाणात स्वतःच्या मनाशी निश्चित केलेली मूल्ये गृहीत धरून, इतकेच नव्हे तर प्रसंगी पूर्वप्रस्थापित मूल्यांशी त्यांची तुलना करूनही त्या कृतीचे स्वतःच्या दृष्टीतून समालोचन करतो. अर्थात् वाङ्मयनिर्मात्या-प्रमाणे समीक्षकही स्वयंप्रज्ञ असल्यामुळे त्याचेही व्यक्तित्व समीक्षेत थोड्या-बहुत प्रमाणात अभिव्यक्त झाल्यावाचून रहात नाही.

याव्यतिरिक्तही अनेकविध प्रकारच्या वाङ्मयविषयक प्रक्रिया समीक्षेशी संबद्ध असतात. एखाद्या जुन्या हस्तलिखिताचे किंवा ग्रंथाचे संशोधनपूर्वक संपादन करणे, त्याचे ऐतिहासिक वा कलात्मक महत्त्व विशद करणे, एखाद्या वाङ्मयीन कलाकृतीचे यथार्थदर्शन घडवणे, व्यक्ती, कालखंड, प्रदेश इत्यादी घटक विचारात घेऊन तत्संबद्ध प्रवृत्तींचा मागोवा घेणे, वाङ्मयप्रकारचर्चा, तसेच वाङ्मयविषयक तात्त्विक चर्चा करणे, कित्येकदा वाङ्मयामागील, सामाजिक, मानसशास्त्रीय अन्वयार्थ उलगडून दाखवणे, थोडक्यात वाङ्मयासंबंधी विविध विचार व अभ्यासपूर्ण लेखन करणे इत्यादी गोष्टींचा समावेश समीक्षेत होतो. 'Any Intelligent discussion about literature' अशी टीकेची केलेली व्याख्या यामुळे लक्षणीय आहे असे म्हणता येते. यावरून समीक्षा या शब्दाचा शब्दकोशांतर्गत अर्थ जरी मर्यादित असला तरी प्रत्यक्षात फार व्यापक अर्थाने तो शब्द वापरला जातो, हे स्पष्ट होईल. कलेच्या क्षेत्रात वापरला जाणारा "समीक्षा" हा शब्द त्या कलाकृतीचे सर्व बाजूंनी निरीक्षण करणे, तिचा सांगोपांग विचार करणे, तिच्यातील अंतःसौंदर्य प्रकट करून दाखवणे, तिचा गूढ अर्थ स्पष्ट करून दाखवणे, त्या कलाकृतीच्या गाभ्या-पर्यंत पोचणे असे अनेक अर्थ सुचवितो. विविध कलांपैकी एक म्हणून साहित्यकला ओळखली जाते. तसेच साहित्य-चर्चाही संबंध शेवटी कलास्वरूप शास्त्रापर्यंत जे पोचतो तेव्हा एखाद्या विशिष्ट साहित्यकृतीच्या आस्वादप्रक्रियेपासून सुरू होणारी साहित्यसमीक्षा कलास्वरूपशास्त्रातील व्यापक सिद्धान्तापर्यंत जाऊन पोचते, इतके तिचे क्षेत्र विस्तृत आहे. वेगवेगळ्या दृष्टिकोनांच्या, वेगवेगळ्या परंपरांच्या समीक्षकांमुळे नाना प्रकारचे संप्रदाय निर्माण झालेले दिसतात. समीक्षेचे तंत्र व आविष्कारपद्धती याबद्दलही मतमतांतरे आढळतात.

## १.१.२ समीक्षेची आवश्यकता :

आपल्याला आवडलेली गोष्ट दुसऱ्याला निवेदन करण्याच्या मनुष्य-स्वभावातूनच तर समीक्षेचा जन्म झाला. साहित्यकृतीतील व्यक्तिचित्रे व्यावहारिक जगातील जिवंत पात्रांपेक्षा वेगळी असली तरी ती "वास्तव" असल्याने भावनोद्दीपन करतात. मात्र साहित्यकृतीचे ते काही अेकमेव कार्य नव्हे. साहित्यकृतीतून कलात्मक साक्षात्काराचा अेक श्रेष्ठ, व्यापक अनुभव रसिकाला आणून देणे हे तिचे त्याहूनही महत्वाचे कार्य होय. जेथे लेखकाचे कार्य संपते, तेथून समीक्षकाचे कार्य सुरू होते. समीक्षक हा लेखक व वाचक यांच्यातील मध्यस्थ असतो. साहित्यकृतीने होणाऱ्या असीम आनंदाचे लोण त्याला वाचकांपर्यंत पोचवायचे असते. सर्वसामान्य वाचकाची रसिकता अपरिपक्व असते. त्याला ढोबळ गोष्टींचेच तेवढे आकलन होते, हे लक्षात घेऊन अशा वाचकांना कलेच्या क्षेत्रात जाणकार करण्याचे, त्यांची अभिरुची संपन्न करण्याचे आणि त्यांची मनोवृत्ती सूक्ष्मगामी करण्याचे, प्रसंगी त्याला नवा दृष्टिकोन देण्याचे कार्य समीक्षक करीत असतो. काही वेळा वाचकांच्या लक्षातही न येणाऱ्या गोष्टी त्याला सांगून समीक्षक अेखाद्या पथदर्शकाची भूमिका घेतो. अेकंदरीत पाहता, समीक्षा ही वाचकांना साहित्यकृतीकडे जास्त जाणकारीने पाहण्यास शिकविते. अशा तऱ्हेने समीक्षेद्वारा विधायक, गुणयुक्त व प्रेरणादायक कार्य घडत असते. वाचकांची अभिरुची अधिक सुजाण, संवेदनाग्राही व समंजस, अुदार व चोखंदळ व्हावी, हा चांगल्या समीक्षेचा हेतू असतो. नाटकाच्या संदर्भात चांगल्या वाचनाबरोबर चांगला प्रेक्षकवर्ग तयार होण्यातही समीक्षेचा मोठा वाटा असतो, असे म्हणता येईल.

## १.१.३ समीक्षा : शास्त्र की कला ?

समीक्षा हा मूलतः शास्त्रीय लेखनप्रकार असला तरी काही वेळा वाङ्मयीन समीक्षेच्या ठायी सर्जनशीलतेचा गुणधर्मही आढळतो. अर्थात् या सर्जनशीलतेला स्वयंभूपण असण्यापेक्षा अेखाद्या कलाकृतीचा आधार असणे आवश्यक असते. अवलोकन, वर्गीकरण, पृथक्करण आणि सिध्दान्त-प्रस्थापन हे टप्पे अितर कोणत्याही शास्त्राप्रमाणे समीक्षेतही असतात. मात्र भौतिक शास्त्रांचे सिध्दान्त

जितके सार्वत्रिक व सार्वकालिक असतात, तितकी सार्वत्रिकता व सार्वकालिकता साहित्यशास्त्रासारख्या शास्त्रातील सिध्दान्तांना असत नाही. तसेच शास्त्र या कल्पनेमध्ये तर्कशुध्द, सुसंगत व सुव्यवस्थित मांडलेला विचार व सिध्दान्त प्रस्थापनेमध्ये झालेली त्याची परिणती ही कल्पना समीक्षेलाही लागू पडते. त्यामुळे समीक्षाही सामाजिक शास्त्राप्रमाणे अेक शास्त्र होय.

समीक्षेला कला म्हणण्याकडे काहींचा कल दिसतो. परंतु कलेची वैशिष्ट्ये समीक्षेतून फारशी आढळत नाहीत. कलावंताच्या हातून जे काही आकाराला आले, त्याची समीक्षक शक्य तितक्या वस्तुनिष्ठपणे मीमांसा करीत असतो, विश्लेषण करीत असतो. त्याच्या या कार्याचे प्रयोजन भावजागृतीपेक्षा ज्ञान-लालसा व विचार जागृती हेच मोठ्या प्रमाणात असते. अशा वृत्तीतून निर्माण होणाऱ्या लेखनाला कलाकृतीचे स्वरूप प्राप्त होण्याची शक्यता फार कमी असते. मात्र समीक्षेत "काव्यात्मक" टीका म्हणून जो प्रकार असतो, तशा प्रकारच्या समीक्षेला कला म्हणण्याकडे अनेकजणांचा कल असतो. अशा काव्यात्मक समीक्षेत अेखाद्या कलाकृतीवरील अभिप्राय व्यक्त करण्याच्या निमित्ताने समीक्षक स्वतः जणू दुसरी कलाकृतीच निर्माण करीत असतो.

अेखाद्या व्यक्तीच्या ठिकाणी कलानिर्मितीसाठी आवश्यक अशी वृत्ती व समीक्षेसाठी आवश्यक अशी क्षमता यांचा आढळ अेकाच वेळी होणे अशक्य नाही. मराठीत माधवज्युलियन, पु.शि.रेगे, विंदा करंदीकर, गंगाधर गाडगीळ यांसारख्या काही व्यक्तींच्या ठिकाणी कलागुण व समीक्षाप्रवृत्ती या दोन्ही गोष्टी आढळतात.

## १.१.४ <u>समीक्षकाच्या ठायी अपेक्षित असणारे गुणधर्म</u> :

समीक्षक हा साहित्यकृतीचा विशेष डोळसपणाने आस्वाद घेणारा अेक रसिक मार्गदर्शक असतो. निर्मळ व समतोल बुध्दी, तीक्ष्ण अंतर्दृष्टी, आस्वादक प्रतिभा, बारीकसारीक तपशिलासह कलाकृतीकडे पाहण्याचे सामर्थ्य अित्यादी अुपजत गुण तसेच विद्वत्ता, तात्त्विक ज्ञान अित्यादी संपादित गुण समीक्षकाच्या ठायी असणे आवश्यक ठरते. वाङ्मयविषयक तात्त्विक प्रश्न,

समीक्षाशास्त्र व अितरही शास्त्र यांविषयीचे ज्ञान त्याच्या बाबतीत अपेक्षित ठरते. यामुळे त्याच्या समीक्षेत प्रमाणबध्दता, यथार्थता आणि सखोलपणा येण्याला मदत होते. आस्वादक प्रतिभेच्या बळावरच तो लेखकाची प्रकृती व प्रवृत्ती समजून घेअू शकतो. त्यामुळे त्याला कलाकृतीचे नेमके सौंदर्य गवसते आणि त्या कलाकृतीचे मर्म तो वाचकांपुढे ठेवू शकतो. अेखादी कलाकृती कोणत्या स्थलकाल-परिस्थितीत निर्माण झाली, त्या देशस्थितीचे, त्या काळाचे आणि समाजस्थितीचे ज्ञान आणि भान समीक्षकाला असले पाहिजे.

वर्तमानकालीन लेखकाबाबत समीक्षकाची जबाबदारी विशेष स्वरूपाची असते. नामवंतांच्या कृतीकडे जसे समीक्षकाने लक्ष दिले पाहिजे, तसेच नवोदितांचे स्वागत करण्याकडे व त्यांची गुणवत्ता लोकांपुढे आणण्याकडे समीक्षकाचे लक्ष असले पाहिजे. तसेच वर्तमानकालीन साहित्याचा परामर्श घेताना साहित्यिका-विषयी राग, लोभ, व्देष अित्यादी विकारांपासून समीक्षकाने दूर राहिले पाहिजे. अेखाद्या व्यक्तीबद्दलचे पूर्वग्रह त्याने मनात बाळगून समीक्षा करता कामा नये.

समीक्षकाला वाचकांबद्दलची काही कर्तव्येही पार पाडावयाची असतात. वाचकाची अभिरुची अधिक संपन्न करण्याचे आणि त्याची साहित्यविषयक किंवा कलाविषयक जाण अधिक डोळस करण्याचे काम समीक्षकाने करावे. आजकालच्या साहित्यसृष्टीत काय चांगले घडत आहे, त्याचा निर्देश समीक्षकाने सुजाण वाचकांसाठी अवश्य केला पाहिजे.

समीक्षकाने सौंदर्याधिष्ठानावर भर द्यावा, थोडक्यात म्हणजे समीक्षकाने साहित्याचा प्रचारक म्हणूनही अुभे ठाकू नये, तसेच आरोपीला पिंजऱ्यात अुभा करणारा न्यायाधीशही होअू नये. समीक्षेत व्यक्तिगतता अपरिहार्य असली तरी पूर्वग्रहदूषितता असू नये. आदर्श समीक्षक हा केवळ नीरस विश्लेषणात आनंद मानणारा भाषापंडित नसून कलावंताप्रमाणे तोही हळुवार मनोवृत्तीचा रसज्ञ असतो. ललितकृतीतील रस सेवन करण्यासाठी प्रथमतः समीक्षकाची वृत्ती सहानुभूतीने द्रवलेली व हळुवार असावी लागते. अन्यथा चांगले समीक्षालेखन साधणे अशक्य होय.

१.१.५ समीक्षेच्या निरनिराळ्या पध्दती :

कलात्मक वाङ्मयाची आलोचना ही मूलतः कलानिष्ठ असावी हेच अधिक स्वाभाविक आहे. ती जीवननिष्ठ, समाजशास्त्रनिष्ठ, मानसशास्त्रनिष्ठ वा नीतिशास्त्रनिष्ठ आहे, असे म्हणणे केवळ मर्यादित अर्थानेच खरे आहे. कारण कला, मग ती चित्र, संगीत, नृत्य, नाट्य वा ललित वाङ्मय यांपैकी कोणतीही असो, तिची पहिली निष्ठा कलेशीच असणार. पण कला ही कलेसाठी, जीवनासाठी की अन्य काही कारणासाठी असे या प्रश्नाला फाटे फुटू लागल्याने कलावादी, जीवनवादी, समाजवादी, नीतिवादी, मानसशास्त्रवादी असे समीक्षेचे विविध प्रकार निर्माण झाले आहेत. ललित वाङ्मयाचे अंतःस्वरूप उलगडून दाखवण्याचा जेव्हा समीक्षक प्रयत्न करतो, तेव्हा त्याची समीक्षा केवळ वस्तुनिष्ठ राहू शकत नाही. ती काही अंशी तरी समीक्षकाच्या व्यक्तिनिष्ठ अनुभवावरच आधारलेली असणार.

१.१.५.१ समाजशास्त्रनिष्ठ समीक्षापध्दती :

ही पध्दती कलानुभवाच्या आकलनासाठी उपयुक्त ठरते. समाजशास्त्रनिष्ठा ही कलाबाह्य निष्ठा असली तरी ती कलेच्या समीक्षेला व विशेषकरून ललितवाङ्मयाच्या समीक्षेला उपकारक ठरल्यावाचून राहत नाही. कारण ललितवाङ्मयाचा मुख्य विषय हाच मुळी मानवी जीवनातील गुंतागुंत उकलून दाखविणे हा आहे. आणि पुष्कळसे मानवी अनुभव हे समाजसापेक्ष असतात. महाराष्ट्रातील विशिष्ट काळातील विधवेचे जीवन, दलिताचे जीवन, हुंडा, विजातीय विवाह अशा प्रश्नांच्या संदर्भातील अनुभव व्यक्तिसापेक्षत्वाबरोबरच समाजसापेक्षही असतात. ललितवाङ्मयाची कृती ही जशी तिच्या कर्त्याच्या व्यक्तित्वाचा आविष्कार असते, त्याचप्रमाणे ज्या देशकालपरिस्थितीत ती निर्माण होते त्या सर्वांचे तिच्यात प्रतिबिंब पडत असते. त्या प्रतिबिंबाचे सम्यक् दर्शन हे समाजशास्त्रनिष्ठ समीक्षेचे आद्य कर्तव्य होय. डॉ.द.का.संतांची या विषयाची मीमांसा अशी - "कलाकृती ही पोकळीतून निर्माण होत नाही. ती केवळ लेखकाची असते, असे नव्हे. तर काल व स्थल यांच्या मर्यादांनी सीमित झालेल्या कलावंताने

समाजाशी केलेला तो संवाद असतो. त्यामुळे लेखकाचे समाजाशी कोणते नाते असते, या गोष्टीस या टीकापध्दतीत महत्त्वाचे स्थान आहे. या लेखक समाज संबंधाच्या शोधनामुळे वाचकाची कलाकृतीकडे पाहण्याची सौष्ठवशोधक दृष्टी अधिक शुध्द होईल, असा या पध्दतीच्या पुरस्कर्त्यांचा विश्वास आहे."[१]

**१.१.५.२ नीतिशास्त्रनिष्ठ समीक्षा पध्दती :**

या पध्दतीत केवळ नैतिक मूल्ये नजरेसमोर ठेवून मूल्यपरीक्षण केले जाते. टीकाविषय असलेल्या साहित्यकृतीचा समाजावर होणारा नीतिमूल्यांच्या दृष्टीने शिष्टानिष्ट प्रभाव ध्यानात घेऊन त्या कृतीचे मूल्यमापन केले जाते. त्याचप्रमाणे लेखकाने आपल्या अनुभूती-आदर्शाद्वारा रसिकांच्या अंतःकरणावर केलेल्या संस्कारांच्या पातळीवरूनही अशी समीक्षा कलाकृतीचे मूल्य ठरवीत असते. अर्थात् कलाकृतीतील कलात्मकतेच्या विचाराकडे या समीक्षा पध्दतीचे त्या प्रमाणात दुर्लक्षच होते.

**१.१.५.३ संस्कारवादी समीक्षापध्दती :**

साहित्याच्या आस्वादाने होणारी स्वाभाविक मानसिक प्रतिक्रिया व्यक्त करणे हीच खरी समीक्षा, अशी संस्कारवादी समीक्षकाची भूमिका असते. या समीक्षकाला कलाकृतीच्या तांत्रिक बाबींचे विशेष महत्त्व वाटत नाही. एखाद्या कलाकृतीत वाचकाला तल्लीन करून सोडण्याचे सामर्थ्य आहे की नाही, जे सांगावयाचे आहे, ते लेखक उत्कटपणे सांगू शकला आहे की नाही, या गोष्टी या समीक्षकाला महत्त्वाच्या वाटतात. याही समीक्षेला मर्यादा आहेत. एक तर व्यक्तिसापेक्षतेला या समीक्षेत अतिशय महत्त्वाचे स्थान असते. त्यामुळे वैयक्तिक पूर्वग्रह, आग्रह, अतिरेक असे दोष या प्रकारच्या समीक्षेत उद्भवतात. वस्तुनिष्ठेपेक्षा व्यक्तिनिष्ठेला या पध्दतीत महत्त्वाचे स्थान असल्याने तिचे निश्चित रूप ठरविणे कठीण होते.

**~~१.१.५.४ चरित्रात्मक समीक्षा पध्दती~~ :**

### १.१.५.४ चरित्रात्मक समीक्षापध्दती :

या पध्दतीचा भर साहित्यकृतीचा निर्माता व त्याची कलाकृती या-मधील संबंध शोधण्यावर व त्याच्या आधारावर कलेतील सत्य प्रस्थापित करण्यावर असतो. लेखकाच्या भोवतीची परिस्थिती, त्याचा व्यवसाय, त्याचे समाजातील स्थान, त्याच्या जीवनात घडलेल्या बऱ्यावाईट गोष्टी इत्यादी-च्या ज्ञानाचा त्याच्या साहित्यकृतीच्या स्वरूपावर प्रकाश पडू शकतो. वाचकांनाही कलावंताच्या जीवनाबद्दल कुतूहल असते. यामुळे ही पध्दती समीक्षक व वाचक दोघांनाही प्रिय झालेली दिसते. परंतु या पध्दतीत काही वेळा अपसिध्दान्त मांडले जाण्याची शक्यता असते. लेखकाचे लौकिक जीवन व त्याचे भावजीवन यामध्ये अनेकदा कमालीचे अंतर असू शकते, म्हणून तर सामान्य चाकोरीचे जीवन जगूनही अनेकांच्या साहित्यातून मर्यादित्याचा आविष्कार झाला.

याशिवाय खरा महत्वाचा प्रश्न असा की रसिकाला लेखकाच्या चरित्रा-विषयी प्रत्यक्ष कर्तव्य नसून त्याची साहित्यकृती हाच रसिकाच्या आस्वादाचा विषय असतो. फारतर साहित्यकृती वाचून लेखकाच्या चरित्राबद्दल अंदाज बांधावेत. अर्थात् ते अंदाज काही वेळा खरे ठरू शकतात, तर इतर काही वेळा फसूही शकतात व चरित्रात्मक समीक्षापध्दती व्यर्थ ठरण्याची शक्यता असते.

### १.१.५.५ मानसशास्त्रीय समीक्षापध्दती :

कलानिर्मितीमध्ये जाणिवेबरोबर नेणिवेचे स्थानही महत्वाचे असते. ही भूमिका मानसशास्त्रज्ञांनी मांडल्यामुळे रचनातंत्राला किंवा त्यातील कौशल्याला पूर्वीसारखे महत्व उरत नाही. अशाचा पात्राचे अंतर्मन व त्यातील सूक्ष्म संघर्ष व्यक्त करणे या समीक्षकांना महत्वाचे वाटते. विशिष्ट पात्राची विशिष्ट मनोरचना बनण्यास कोणती परिस्थिती कशी कारणीभूत झाली, त्या पात्राच्या मनाच्या प्रकट बाजू कोणत्या आणि त्याच्या मनातील अंतर्गत खळबळ कोणती याचा हा समीक्षक शोध घेतो. अबोध मनाचे प्रकटीकरण तर्कशुध्द, सुसंगत रीतीने होणे शक्य नाही, त्यामुळे स्वैर स्वरूपाचा विचारप्रवाह आणि त्यानुसार

भाषेचे स्वैर स्वरूप या समीक्षेला मान्य आहे. मात्र प्रत्येक कलाकृती म्हणजे केवळ अचेतन मनाचा आविष्कार असे मानणे अयोग्य ठरेल. नाटक, कादंबरी इत्यादी वाङ्मय प्रकारांमध्ये पूर्वनियोजनास व सूत्रबध्दतेला निश्चित स्थान दिले जाते.

## १.१.५.६ अभिजातवादी समीक्षापध्दती :

गतकालात जे श्रेष्ठ दर्जाचे लेखक होऊन गेले, त्यांच्या कलाकृती आदर्श म्हणून समोर ठेवून नव्या प्रयोगांचे मूल्यमापन करणारी अशी ही पध्दती आहे. या पध्दतीमध्ये समीक्षकाच्या हाती काही थोर व उच्च मूल्ये असतात, हा फायदा असतो. परंतु केवळ प्राचीनांना आदर्श मानून चालण्यात कला ही सदैव विकसनशील असते या महत्वाच्या गोष्टीचा विसर पडण्याचा संभव असतो, हा तोटा आहे. समाजाला सत्प्रवृत्त करणे हे साहित्याचे काम असल्याचे ही समीक्षा मानत असल्याने नीतिप्रधान साहित्याचे गुणगान व अनीतिकारक साहित्याचा धिक्कार हे या पध्दतीचे वैशिष्ट्य आहे. अमुक संकेताचे पालन केले आहे, म्हणून ही कृती यशस्वी आणि अमुक संकेताचे पालन झाले नाही म्हणून ती अयशस्वी असा निर्णय या पध्दतीत दिला जातो. म्हणून तिला कित्येकदा "निर्णायक टीका" असेही म्हटले जाते.

## १.१.५.७ स्वच्छंदवादी समीक्षापध्दती :

अभिजातवादी समीक्षेची प्रतिक्रिया म्हणून स्वच्छंदवादी समीक्षापध्दती अस्तित्वात आली. प्रत्येक प्रतिभावान हा स्वतंत्र असतो. त्यामुळे त्याच्या कृतीची चर्चा ठराविक नियमांच्या आधारे न करता, त्या कलाकृतीचा रसिकांच्या मनावर काय परिणाम होतो, याचा शोध घेणे आवश्यक आहे. या समीक्षकांच्या मते सौंदर्योपासक अशा कलावंताकडून केवळ सौंदर्याच्या प्रकटीकरणासाठीच साहित्यनिर्मिती होत असते. या सौंदर्याच्या आस्वादात व चिंतनात अलौकिक आनंदाची रसिकास अनुभूती येते. स्वच्छंदवादी समीक्षापध्दतीतूनच कालांतराने सौंदर्यवादी समीक्षापध्दती (Aesthetic Criticism) उदयास आली. "कलेसाठी कला" हे या समीक्षापध्दतीचे ब्रीदवाक्य होय. ही समीक्षापध्दती कल्पनेच्या मुक्त विहारालाही महत्वाचे स्थान देते. अभिजातवादी व स्वच्छंदवादी या दोन्ही पध्दती अगदी दोन टोकाच्या असल्याने

चांगल्या टीकाकारांनी या पद्धतींचा तारतम्याने समन्वय करणे योग्य ठरेल.

येथपर्यंत समाजशास्त्रनिष्ठ, नीतिशास्त्रनिष्ठ, संस्कारवादी, चरित्रात्मक, मानसशास्त्रीय, अभिजाततावादी व स्वच्छंदतावादी अशा काही समीक्षापद्धतींचा स्थूल निर्देशात्मक विचार केला. या व्यतिरिक्तही समीक्षा पद्धती असतात. तसेच नव्याने त्या निर्माणही होत असतात. प्रत्येक समीक्षापद्धतीमुळे काही ना काही साध्य होण्यासारखे असते. तसेच तिला काही अंगभूत मर्यादा असतात. काही वेळा दोन पद्धतींचा मेळ घालूनही समीक्षा केली जाते. समीक्षापद्धतींचे विशेष समजल्याने साहित्याच्या आस्वादनाला व समीक्षेच्या आकलनाला साहाय्य होते.

### १.१.९ नाट्यसमीक्षेचे वेगळेपण :

नाटकाला साहित्यिक व प्रयोगसंबध्द अशी दोन अंगे असल्याने नाट्यसमीक्षेलाही द्विविधत्व निर्माण होते व या दृष्टीने इतर साहित्यसमीक्षेहून एक खास वेगळेपण या समीक्षेला प्राप्त होते. नाटक हे दृश्यकाव्य असल्याने इतर कोणत्याही साहित्यप्रकाराहून ते वेगळे ठरते. साहित्यमूल्य व प्रयोगमूल्य अशा दोन निकषांवर त्याचे परीक्षण करावे लागते, ते त्याच्या या "दृश्य" व "काव्य" अशा संमिश्र प्रकारामुळेच. चित्र, संगीत, नृत्य इत्यादी इतर कलांच्या साहाय्याने ते प्रेक्षकांपुढे येत असल्याने त्यातील अनुभव अधिक चैतन्यपूर्ण बनतो. कल्पनेने साहित्यातील अनुभव आकळण्यापेक्षा त्याचे प्रत्यक्ष मूर्तीकरण व साक्षात् पुढे उभे राहत असल्याने प्रेक्षकांच्या अनुभवाचाच ते विषय बनते. स्वाभाविकच परिणामकारकतेच्या संदर्भात इतर साहित्यप्रकारांपेक्षा नाटक उजवे ठरते, अधिक समर्थ ठरते. प्रयोगक्षमतेकरिता विवक्षित काळाचे व रंगभूमीमुळे विवक्षित स्थळाचे बंधन नाटकावर पडते खरे, पण त्यामुळेच ते कथा, कादंबरीसारखे पाल्हाळिक होत नाही व अत्यावश्यक तपशीलानेच ते सादर होते. याही गोष्टींने त्याचे वेगळेपण सिध्द होते.

अेकूलत्या अेक "संवाद" माध्यमातून सादर होण्याच्या त्याच्या प्रकारानेही हा वेगळेपणा आपसी अेकदा सिध्द होतो. आणखी अेक गोष्ट या सर्वाहून महत्वाची ठरते, ती म्हणजे नाटक हे गर्दीकरिता लिहिले जाते. "गर्दीतील अेक" या भूमिकेने प्रेक्षक त्याचा आस्वाद घेत असतो. त्यामुळे नाटकाच्या आस्वादाच्या संदर्भात अेकाच वेळी त्याची वैयक्तिक भूमिका व गर्दीतील अेक प्रतिनिधी म्हणून असणारी भूमिका या दोन्हींचे अस्तित्व असते. यामुळे नाटकाच्या परिणामात निराळेपणा निर्माण होतो. अेकाच वेळी अनेकांना आवडू शकेल असे काही नाटकात असावे लागते, तेही या गर्दीमुळेच.

वरील सर्व विवेचनावरून नाटकाच्या ठायी साहित्यिक व प्रयोगसंबध्द अशा दोन्ही गोष्टींची आवश्यकता कशी असते हे ध्यानी यावे. यामुळेच त्याची खरी परीक्षा त्याच्या दोन्ही अंगांच्या विचारानेच सिध्द होते. अर्थात् हे तितकेच खरे की "दृश्य" असले तरी मूलतः नाटक हे "काव्य"(साहित्य) असते. प्रयोगदृष्ट्या ते जनमानसाची मर्यादित काळच पकड घेते. त्यानंतर नव्यानव्या नाटकांच्या प्रयोगाकडे कुतूहलाने पाहू इच्छिणाऱ्या प्रेक्षकवर्गापुढे प्रयोगदृष्ट्या ते टाकाऊ ठरू लागते. अशावेळी त्यातील साहित्य गुणांवरच ते "टिकाऊ" आहे की नाही, हे ठरत असते. कालिदासाचे "शाकुंतल", शेक्सपियरचे "हॅम्लेट", किर्लोस्करांचे"सौभद्र" देवलांचे "शारदा" यासारखी नाटके आज अस्तित्वात [illegible] आहेत ती त्यांच्या ठायींच्या या वरील गुणांमुळेच.

येथे हे ध्यानी घ्यायचे आहे की, नाट्यसमीक्षा ही दुपेडी असते. संविधानक, व्यक्तिचित्रण, जीवनानुभव, भाषाशैली इत्यादी गुणांच्या बरोबर अभिनय, नेपथ्य, प्रकाश, संगीत इत्यादी गुणांच्या चर्चेनेच हे दुपेडीपण उभे राहते व या दुहेरीपणामुळेच इतर साहित्यसमीक्षेपेक्षा नाट्यसमीक्षा वेगळी ठरते.

## <u>१.२</u> <u>१८९५ ते १९४५ या कालखंडातील नाट्यसमीक्षा - सामान्य स्वरूप</u> :

इ.स.१८४३ मध्ये जरी विष्णुदासांनी नाटकांना सुरवात केली, तरी ती लिखित स्वरूपात नव्हती. लिखित नाटके अस्तित्वात येऊन त्यानंतर त्यांच्या-

बद्दलची समीक्षा सुरू व्हायला लागण्यास १५-२० वर्षांचा काळ लागला हे सत्य ध्यानी घेतले असता अभ्यासविषयीभूत कालखंडाचा पूर्वार्ध हा नाट्यसमीक्षेचा सुरवातीचा कालखंड आहे, हे लक्षात येते. ही गोष्ट ध्यानात ठेवूनच या काळातील समीक्षेचे स्वरूप पाहायला हवे. त्याचबरोबर या समीक्षेनेच पुढील काळातील समीक्षालेखनाची पायवाट तयार करून दिली, हेही ध्यानात ठेवायला हवे.

या विशिष्ट काळात जे जे प्रश्न समीक्षकांना जाणवले, त्याची त्यांनी चर्चा केली आहे. ती वाचून आजच्या काळात आपल्याला त्या प्रश्नांचे स्वरूप जाणून घेण्यास साहाय्य होते. अर्थात् त्यातील काही प्रश्नांची उत्तरे कालांतराने अंशतः वा पूर्णतः मिळाली आहेत. उदाहरणार्थ स्त्रियांनी नाटकात कामे करावीत की नाहीत, हा प्रश्न. यासंबंधी या काळात बरीच चर्चा झाली आहे यथावकाश इ.स.१९३३ मध्ये "आंधळ्याची शाळा" मधील स्त्रीभूमिका स्त्रियांनी करायला सुरवात केली व तेथून पुढे त्या भूमिका स्त्रियाच करू लागल्याने वरील प्रश्नाचे उत्तर अनुभवानेच मिळाले. नाटकातील संगीताच्या प्रश्नाबद्दलही असाच प्रकार घडला. संगीत नाटकांचा बराच प्रसार झाल्यानंतर संगीत हे नाटकाला मारक ठरते की काय अशा तऱ्हेची चर्चा होऊ लागलेली आढळते. कालांतराने वरेरकरांच्या नाटकांपासून नाटकातील पद्यांची संख्या कमी झाली. तसेच नाटक हे संगीतयुक्त असलेच पाहिजे हा दंडकही नष्ट झाला, असे आढळते.

एखाद्या कलाकृतीच्या विवरणात्मक विवेचनाला वा परीक्षणाला समीक्षेत गणले जात असले तरी समीक्षेचे स्वरूप केवळ तेवढेच मर्यादित नसते. एखाद्या कलाकृतीच्या वैशिष्ट्यांची चर्चा, तिचे मर्मदर्शन, लेखनातील विविध वैशिष्ट्ये व प्रवृत्ती यांची चर्चा-चिकित्सा, कलाकृतीतील सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ तपासणे, तसेच एखाद्या लेखकाच्या लेखनाचा कालानुगामी अभ्यास, केवळ साहित्य-स्वरूपाची सैद्धान्तिक चर्चा इत्यादी प्रकारच्या लेखनाचा समीक्षेत समावेश होऊ शकतो, याचे प्रतिपादन सुरवातीला केलेच आहे. या दृष्टीने १८६५ ते १९३५ या कालावधीत नाट्यसमीक्षा क्षेत्रात कोणकोणत्या गोष्टींचा विचार झाला ते येथे अभिप्रेत आहे.

१८५१ साली सदाशिव बजाबाशास्त्री अमरापूरकर व रावजी बापूजी शास्त्री बापट यांनी "प्रबोधचंद्रोदय" या संस्कृत नाटकाचे भाषांतर केले. त्याच्या प्रस्तावनेत या दोघांनी भाषांतरासंबंधी आणि नाटकाविषयी काही विधाने केली आहेत. कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी "शालापत्रक" या नियतकालिकाच्या १८६५ च्या अेप्रिल आणि मेच्या अंकात वि.ज.कीर्तने यांच्या "जयपाल" व "थोरले माधवराव पेशवे" या नाटकांची परीक्षणे लिहिली. त्या निमित्ताने त्यांनी "नाटक" हा अेक वाङ्मयप्रकार म्हणून त्याचा संविधानक, संभाषण अशा अंगांनी विचार केला असून शिवाय शोकात्मिकेचे [illegible] स्वरूप ती लिहिण्याची शिष्टता व आवश्यकता, भारतीय नाट्यसृष्टीतील शोकात्मिकेचा अभाव यांचाही विचार केला आहे. नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या अशा परीक्षणांबरोबरच स्वतंत्र निबंधांतून आणि पुस्तकांतूनही मराठी नाटके व त्यांचे प्रयोग इत्यादी विषयी जे जे विचार व्यक्त केले गेले, त्यांनी नोंद या प्रबंधात करण्याचा प्रयत्न आहे. १८७२ साली "ज्ञान प्रसारक मंडळा"पुढे वाचला गेलेला का.बा.मराठे यांचा "नावल व नाटक ह्यां विषयी निबंध", १९०३ मध्ये प्रसिद्ध झालेले आप्पाजी विष्णु कुलकर्णी यांचे "मराठी रंगभूमि" हे पुस्तक, तसेच प्रथम "रंगभूमि" या नियतकालिकातून आणि नंतर १९१० मध्ये पुस्तकरूपाने प्रसिद्ध झालेला गो.बा.बापट यांचा "नाटकविषयक व्यापक विचार" हा निबंध, श्री.कृ.कोल्हटकरांनी लिहिलेली नाटकांची परीक्षणे व त्या निमित्ताने केलेली नाट्यवाङ्मयाबद्दलची सखोल चर्चा, "विविधज्ञानविस्तार", "मासिक मनोरंजन" "प्रतिभा" इत्यादी नियतकालिकांतून आलेली नाट्यविषयक चर्चा, "नाट्यकला", "रंगभूमि" अशा नाट्यविद्यालाच वाहिलेल्या नियतकालिकांतून जाणीवपूर्वक व्यक्त झालेला नाट्यविचार, असे विविध प्रकारचे समीक्षालेखन या काळात झालेले आढळते. या सर्वांचे विवेचन या प्रबंधात करण्यात येणार आहे.

नाटक हा अेक कथात्मक वाङ्मयप्रकार आहे. पण ही कथा रंगभूमीवर काम करणाऱ्या नटांच्या संवादातून आणि अभिनयातून, अेका विशिष्ट काल-मर्यादेत प्रेक्षक श्रोत्यांसमोर उभी करावयाची असते. अशाच विशिष्ट काळात

रंगभूमीवर जी प्रयोगसाधने उपलब्ध असतात, त्यांच्या मर्यादाही अर्थातच प्रयोगाला पडतात. बऱ्याच वेळा, त्या मर्यादा लक्षात घेऊन नाटककार नाटक लिहीत असतात. आणि हे सर्व घटक ध्यानात घेऊन नाटकाचे रसग्रहण करावे लागते. प्रेक्षकांच्या अभिरुचीला वळण लावण्याचे काम आपल्या, सुसंस्कृत अभिरुचीच्या समीक्षकांनी करावयाचे असते. मराठी नाट्य समीक्षेच्या प्रारंभकालापासून मराठी नियतकालिकांतून लिहिणाऱ्या समीक्षकांनी हे काम केले आहे, असे दिसून येते. नाटकाचा विषय, तो नाटकातून व्यक्त करण्याची नाटककाराची पध्दती, नटांची भाषणे व अभिनय, नाटकातील संगीताचे स्थान व कार्य, त्यांतील पदांची अर्थयोजना व त्यांच्या चाली, संगीत नाटकात होणारी अभिनयाची कुचंबणा, इत्यादी अनेक विषयांवर त्या काळातही नाट्यसमीक्षकांनी सूक्ष्म व सडेतोड लेखन केले आहे. इतकेच नव्हे तर प्रेक्षकांनीही नाटक मंडळींना पत्रे पाठवून त्याविषयीची आपली मते निःसंकोचपणे व्यक्त केली आहेत. अशांच, असंस्कृत, ग्राम्य लेखनपध्दतीवर नेहमीच टीका केली गेली आहे. त्याचप्रमाणे समाजावर नाटकाच्या होणाऱ्या नैतिक संस्कारांचाही विचार या कालखंडातील नाट्यसमीक्षेत केला गेला आहे. सुशिक्षित, पदवीधर, अध्यापन व्यवसायातील, तसेच सार्वजनिक जीवनातील प्रतिष्ठित व्यक्तींचा नाट्यव्यवसायाशी संबंध येत राहिल्याने मराठी नाट्यसंबंधाने अगदी अगदी आरंभापासूनच अनेक विशिष्ट पातळीवरून विचार होत गेला.

या सान्या समीक्षालेखनाचे, विवेचनाच्या सोयीसाठी तीन विभाग पाडले आहेत:

१. नाटक या वाङ्मयप्रकाराविषयीचे सैध्दान्तिक लेख.
२. नैमिका नाटकावरील परीक्षणलेख.
३. नाटककारांसंबंधीचे समीक्षालेखन.

## <u>१.२.१</u> <u>नाटक या वाङ्मयप्रकाराविषयीचे सैध्दान्तिक लेखन</u> :

नाटकाबद्दल चर्चा करणारे, नाटक या वाङ्मयप्रकारासंबंधी (Form of Literature) विवेचन करणारे, नाट्यशास्त्रासंबंधी मूलभूत माहिती देणारे असे लेख हा या समीक्षेतील महत्त्वाचा भाग आहे. या सन्टीच्या लेखांमधून नाटक

या विषयाचा बऱ्याच अंगांनी विचार झालेला आपल्याला दिसतो. "रंगभूमि" हे नियतकालिक नाटक या विषयालाच वाहिलेले होते आणि ते "नाट्यविषयक व्यापक विचारांची सर्वांगीण प्रौढ चर्चा घडावी, या हेतूनेच चालू झाले होते. त्यामुळे सैध्दान्तिक विचार मांडणारे लेख या नियतकालिकातून प्रसिध्द होऊ लागले व या विचारांना चालना मिळू लागली. नाटक या वाङ्मयप्रकाराचा विचार, शोकान्त नाटके, आनंदपर्यवसायी नाटके, नाट्यरचनातंत्र, नाट्य-विषयक टीकाशास्त्र, नाट्यपरीक्षणतंत्र, नाट्यकलेच्या अवनतीची कारणे, नाट्य-शिक्षण अशा अनेक अंगांचा विचार करणारे लेखन टीकाकारांनी केले आहे. "नाट्यकला" आणि "रंगभूमि" या नियतकालिकातून अशी सैध्दान्तिक चर्चा करणारे बरेच लेख आढळतात. त्याचबरोबर "विविधज्ञानविस्तार" "प्रतिमा" "नवयुग" "रत्नाकर" अशा इतर नियतकालिकांतूनही सैध्दान्तिक चर्चात्मक लेख प्रसिध्द झाले आहेत. अशा तऱ्हेचे लेखन करणारी व्यक्ती साक्षेपी, अभ्यासू असायला हवी. का.बा.मराठे, अ.वा.बर्वे, कृ.आ.गुरुजी, गो.वा.बापट, शं.वा.मुजुमदार, श्री.कृ.कोल्हटकर, न.चिं.केळकर, के.ना.काळे, श्री.ना.बनहट्टी अशा जाणकार मंडळींनी केलेल्या लेखनात त्याचा प्रत्यय आणवतो, यात वादच नाही.

## १.२.२ अनेका नाटकावरील परीक्षणलेख :

बहुतांश नाट्यपरीक्षणे, विशेषतः नियतकालिकांतील, ही त्या नाटकाच्या निर्मितीनंतर लगोलगच लिहिली जातात. त्यामागे असणारे एक सत्य असे की, नव्याने निर्माण झालेले नाटक हे लोकांपर्यंत परिचयाच्या द्वारे पोचण्याकरिता नियतकालिकाकडे अभिप्रायार्थ पाठविले जाते. या प्रथेनुसार संपादकांकडे नाटके आल्यानंतर ते स्वतः परीक्षणे लिहितात किंवा इतर जाणकार व्यक्तींकडून लिहवून घेऊन ती प्रसिध्द करतात. यामुळे नवीनवी नाटके लोकांसमोर यायला निश्चितच साहाय्य होते. १८९५ ते १९३५ या कालखंडातही नियतकालिकांमधून अशा तऱ्हेचे परीक्षण लेख आले आहेत. त्यांची संख्या जवळ जवळ २५० इतकी आहे. काही वेळा ज्या नाटकावर परीक्षणात्मक लेख आला, ते नाटक सामान्य असले तरी, त्याच्या परीक्षणाच्या निमित्ताने

मांडलेला वेगळा दुसरा विचार समीक्षेच्या दृष्टीने महत्वाचा होता. याशिवाय "एकच प्याला", "वधूपरीक्षा", "स्वयंवर" "आंधळ्यांची शाळा" अशा लोकप्रिय ठरलेल्या नाटकांवर तर बरेच परीक्षणलेख आले आहेत. काही वेळा जुजबी स्वरूपाची त्रोटक परीक्षणे लिहिली गेली आहेत. नाटकाच्या वेगवेगळ्या अंगाची चिकित्सा त्यातून केली गेली आहे तर काही वेळा त्याच्या बऱ्याच अंगांचा साकल्याने विचार परीक्षणलेखातून करण्यात आला आहे. काही परीक्षणे दोषदिग्दर्शनासाठीच लिहिली गेलेली दिसतात, तर काही वेळा केवळ गुणवर्णनपर लेखनच या परीक्षणातून केले जाते. विवक्षित नियतकालिकाचा दर्जा, स्वरूप, त्याचे धोरण, त्याचा वाचकवर्ग कोणत्या प्रकारचा आहे यावर तसेच नाट्यकृतीचे स्वरूप, तिच्या लेखकाचे कलात्मक सामर्थ्य कलाक्षेत्रातील त्याचे कर्तृत्व यासारख्या गोष्टींवर परीक्षणांचे स्वरूप अवलंबून असलेले दिसते.

प्रारंभीच्या काळात अनेक वेळा या परीक्षणलेखांमध्ये समीक्षकाचे नावच दिलेले आढळत नाही. क्वचित टोपणनावानी ती लिहिलेली आढळतात. "रंगभूमि", "विविधज्ञानविस्तार" अशासारखी काही नियतकालिके बरीच वर्षे चालली होती. साहजिकच त्यातून आलेली परीक्षणे संख्येने जास्त आहेत. काही नियतकालिकातून मात्र थोडीच नाट्यपरीक्षणे प्रसिध्द झाल्याचे आढळते. अ.वा.वर्टी, श्री.कृ.कोल्हटकर, ग.कृ.आगाशे, त्र्यं.वि.पर्वते, मा.व.पटावळ, द.भी.पंगु, व.शां.देसाई, पुं.रा.लेले, र.गो.सरदेसाई, वि.ह.कुलकर्णी, र.कृ.फडके, ना.सी.फडके, वि.स.खांडेकर, मा.वि.वरेरकर, गो.ना.बनहट्टी अशा अनेक नामवंत समीक्षकांनी बऱ्याच नाटकांची परीक्षणे लिहिली आहेत. श्री.कृ.कोल्हटकरांचे "तोतयाचे बंड", "सौभद्र" यावरील टीकालेख गाजलेले आहेत. तसेच "श्रीसरस्वतीमंदिर"मधला "साहित्यकराचा मराठी हॅम्लेट", "मद्यपान-विषयक तीन नाटके" हा त्र्यं.वि.पर्वते यांचा लेख, ना.सी.फडके यांचे "एकच प्याला", "भावबंधन" यावरील परीक्षण लेख हे अन्य काही महत्त्वाचे परीक्षण लेख होत.

नाटक हे दृश्यकाव्य असल्याने संहितेइतकेच प्रयोग हेही नाटकाचे अंग महत्वाचे असते, हे सुपरिचित आहे. म्हणून नाट्यसमीक्षेमध्ये संहिताविषयक विचाराबरोबरच प्रयोगसंबध्द अंगांचाही विचार वस्तुतः झाला पाहिजे. परंतु

१८९५ ते १९३५ या कालखंडात नाटकाच्या साहित्यगुणांबद्दलच प्राधान्याने, आणि शेवटी शेवटी फारच थोडक्यात अभिनय, देखावे, नटाची गायनाची तयारी अशा अंगांबद्दल त्रुटक स्वरूपाचे काही व तेही अल्प प्रमाणात लिहून परीक्षण पुरे केले जाई. वास्तविक नेपथ्य, पोशाख इत्यादींमध्ये कालांतराने बऱ्याच सुधारणा घडत होत्या. प्रकाशयोजनेचेही महत्त्व वाढू लागले. या नव्या गोष्टींची जाण त्या काळातल्या समीक्षकांना नसेल, असे काही म्हणता येणार नाही. परंतु त्याही बाबींबद्दल लिहायला हवे, हा साक्षेप तेव्हाच्या समीक्षकांनी फारसा बाळगलेला दिसत नाही. एखाद्या नाटकातील आशय आविष्कृत कसा झाला, व त्याचे वाङ्मयीन मूल्य प्रयोगामुळे अधिक प्रभावी ठरले की, निष्प्रभ झाले, अशा गोष्टींकडे एकंदरीतच या परीक्षणात्मक समीक्षेचे दुर्लक्ष झाले.

## १.२.१ नाटककारासंबंधीची समीक्षा :

नाट्यविषयक सैद्धान्तिक विवेचन व स्वतंत्रपणे एकेका नाट्यकृतीची परीक्षणे या दोन प्रकारच्या समीक्षा लेखनाप्रमाणे एकेका नाटककाराच्या समग्र नाट्यवाङ्मयाची समीक्षा करणारे लेखनही या काळात मुबलक नव्हे पण थोडेफार निर्माण झाले. किर्लोस्कर, देवल, कोल्हटकर, खाडिलकर, गडकरी, मा.वि. वरेरकर अशा प्रसिद्ध नाटककारांच्या सर्व नाट्यवाङ्मयाचा एकत्रितपणे विचार करणारे लेख वा पुस्तकेही या कालखंडात निर्माण झाल्याचे आढळते. "नाट्यकला" "रंगभूमि" यासारख्या नियतकालिकांनी रसिकांची नाट्यविषयक जाण वाढवायला आरंभ केल्यानंतर "विविधज्ञानविस्तार" "प्रतिमा" "रत्नाकर" अशा अनेक नियत-कालिकांतूनही नाटककारांबद्दल साक्षेपाने विचार व्यक्त करणारे लेख आलेले आढळतात. उदाहरणार्थ, "कोल्हटकरांची नाटके" – वि.स.खांडेकर, यांचा लेख वा "नाटककार खाडिलकर" – मा.वि.वरेरकर यांचा लेख. अशा तऱ्हेचे लेख वाचले असता एक गोष्ट आपल्या ध्यानात येते ती अशी की, या लेखांमधून नाटकासाठी विषय निवडण्याची नाटककाराची हातोटी, तो फुलवण्याचे त्याचे सामर्थ्य, त्याचे भाषाविभव, तसेच कथानक मांडणीचे चातुर्य इत्यादी गोष्टींचा परामर्श अपेक्षित असतो. असे लेख बहुतक वेळा वि.ल.भावे, वि.स.खांडेकर,

ना.सी.फडके, व.शां.देसाई, मा.वि.वरेरकर अशा आक्षेपी व अभ्यासू समीक्षकांनी लिहिलेले आढळतात. बरेच वेळा या समीक्षकांनी सामाजिक दृष्टिकोनातून विवेचन केले आहे, तर क्वचित कलावादी भूमिकेतून नाटकांचे मूल्यमापन करण्याचा प्रयत्न आढळतो. परंतु बहुधा नाटकातील प्रतिपाद्य विषय, समाजशिक्षणाच्या दृष्टीने त्या नाटकाची उपयुक्तता, या विषयीच बरीच चर्चा झालेली आढळते. पुनर्विवाहाचा पुरस्कार, विषमविवाहाचे दुष्परिणाम अशांपैकी कोणत्या हेतूने नाटक लिहिले हे समीक्षेत पाहिले जात असे.

विशिष्ट नाटककार व त्यांचे नाट्यकर्तृत्व याचे समालोचन करणारी पुस्तकेही या काळात तयार झालेली आढळतात. गडकऱ्यांच्या सर्व नाटकांची एकत्र चर्चा करणारा प्रथम ग्रंथ स.वा.जोशी व के.बा.पाठे यांनी सि.स.१९२४ मध्ये लिहिला. किंवा "कृ.प्र.खाडिलकर यांची नाट्यसृष्टी" हे वा.ह.धारपुरे यांनी लिहिलेले पुस्तक १९३० मध्ये प्रसिध्द झाले होते. यात ऐतिहासिक नाटके पौराणिक नाटके, आनंदपर्यवसायी नाटके, तत्त्वप्रधान नाटके अशा वर्गीकरणाने विवेचन करण्यात आले आहे. "गडकरी : व्यक्ति व वाङ्मय" यांत शेवटी वि.स.खांडेकरांनी गडकऱ्यांच्या नाट्यरचनेचा, नाट्यविषयाचा, संविधानकाचा सूक्ष्म विचार केला आहे. प्रामुख्याने अशा पुस्तकांमधून नाट्यविषय, संविधानक व्यक्तिचित्रण, रसपरिपोष, भाषाशैली, नाटकातील ‍इतर गुणदोष अशा मुद्यांच्या अनुषंगानेच नाटककारावर लिहिले जाते. त्यामानाने प्रतिभा, कल्पकता, कविमनाची जडणघडण आणि त्याचा आविष्कार या बाबतीत स्थूल दृष्टीनेच लिहिले गेले आहे. या दृष्टीने नाटककारांचा विचार करणारी पुस्तके नंतरच्या कालखंडात लिहिली गेली आहेत. उदाहरणार्थ "नाटककार खाडिलकर - एक अभ्यास", वा.ल.कुलकर्णी, १९६५. "किर्लोस्कर - व्यक्ति आणि कला" - ना.सी.फडके, १९६४. नाटकाकडून नाटककाराकडे जावे किंवा नाटककार समजावून घेऊन त्याच्या नाटकाकडे जावे, अशा दोन पध्दती अंगिकारल्या जातात. एखाद्या नाटककाराचा अभ्यास करताना त्याच्या नाटकातील तंत्र व मंत्र, त्यातील विनोद, संगीत इत्यादी अंगोपांगांचा व

गुणावगुणांचा साकल्याने विचार होणे आवश्यक असते..

या दृष्टीने विचार करून १८९५ ते १९३५ या कालखंडातील लेखांचे स्वरूप तसेच पुस्तकांचे स्वरूप न्याहाळण्याचा प्रयत्न या प्रबंधात केला आहे. त्या काळात आजच्याजितक्या निरनिराळ्या अंगांनी विचार करण्याची दृष्टी नव्हती. आजच्याजितका सूक्ष्मपणा वा समीक्षेतील विविधता अथवा कलात्मकता नव्हती. नाटकाचे समाजातील स्थान हे अुपयुक्ततेचे होते. कलात्मक वृत्ती त्यावेळी निर्माण झालेली नव्हती. नीतिविषयक कल्पनेवरच जीवन प्रामुख्याने आधारलेले होते. त्यामुळे सहसा त्या काळातील समीक्षा ही नीतिकल्पनासापेक्ष होती.

वरील तिन्ही प्रकारच्या नाट्यसमीक्षेचा विचार करता असे लक्षात येते की, मराठी समीक्षेचे प्रारंभीचे स्वरूप बोधवादी होते. लेखनातील सर्व प्रकारच्या चुका दाखवणे आणि लेखकाला व वाचकाला मार्गदर्शन करणे हे आपले कामच आहे असे श्री.कृ.कोल्हटकर, न.चिं.केळकर यांच्यासारख्या टीकाकारांनी मानले आणि जितरांनीही बराचसा तोच कित्ता गिरविला. तत्कालीन सामान्य वाचकांना शिकवणे, समजावून सांगणे जित्यादीसाठी त्यावेळची नाट्यविषयकच नव्हे तर जितरही समीक्षा झुकलेली प्रत्ययाला येते. नाट्य हा संमिश्र कलाप्रकार आहे व त्या स्वरूपातच त्याची चर्चा झाली पाहिजे याचे भान ठेवणारे नाट्यसमीक्षक फार थोडे आढळून येतात. भारतीय नाट्यपरंपरा, संस्कृत नाट्यवाङ्मय, नाट्याची पाश्चात्य परंपरा, लोककलेच्या स्वरूपातील नाट्य, नाटकाची बलस्थाने व त्याच्या मर्यादा, जितर ललित कलांचा नाटकाशी येणारा कमीअधिक संबंध, नाटकाची परिस्थितीसापेक्षता, वैज्ञानिक प्रगतीचा रंगभूमीच्या दृष्टीने आलेला अनुकूल वा प्रतिकूल परिणाम, रंजन व अुद्बोधन यांचे नाटकाच्या संदर्भातील तारतम्य, नाटक व चित्रपट, प्रेक्षकांची अभिरुची व त्याचा नाटकावर होणारा परिणाम, नाटकावरील शासकीय निर्बंध, त्याची जिष्टानिष्टता या सारख्या अनेक प्रश्नांचा परिपूर्ण व सखोल विचार करणारे मर्मज्ञ नाट्यसमीक्षक संख्येने फार थोडे आहेत. प्रस्तुत प्रबंधाच्या कालखंडात का.बा.मराठे, अ.बा.गर्दे, गो.बा. बापट, ढुं.बा.मुजुमदार, श्री.कृ.कोल्हटकर, व.शां.देसाअी, वि.स.खांडेकर, र.कृ.लढके, ना.सी.फडके, वा.ह.थारपुरे अशा साक्षेपी समीक्षकांचे लिखाण आढळते.

एकंदरीत पाहता, विविध नियतकालिकांतून आलेले, विविध लेखकांनी लिहिलेले लेख अभ्यासून या कालखंडातील नाट्यसमीक्षेचे स्वरूप ठरवून तिचे सामर्थ्य व मर्यादा या दोन्हींचा मागोवा घ्यावयाचा आहे. यात एकाच विषयावर बऱ्याच लेखकांनी विचार मांडले आहेत, तसेच एका लेखकाने अनेक विषयांवर आपली मते प्रदर्शित केली आहेत. हे लेख विविध स्वरूपाचे आहेत. यांच्या अभ्यासातून हाती येणारे निष्कर्ष त्या त्या प्रकरणात नोंदविले आहेत.

ooo

## संदर्भ सूची


१. The Oxford English Dictionary, 1933,Vol.II, Page 1181

२. Webster's Third New International Dictionary,1768, page 538.

३. I. T. Shipley. Dictionary of World Literature,1960 Page 81

४. Encyclopaedia Britannica, 14th Edi. Page 727

५. दि. के. बेडेकर, "साहित्य : निर्मिती आणि समीक्षा", १९६६, पृ.३

६. दु.का.संत, "वाङ्मयीन विडम्बना", १९७६, पृ.८०


०००